---

## 2. नीतिमूल्ये व त्यांचे स्वरूप

---

**व्याख्या :**

नीती म्हणजे समाजात, कुटुंबात परस्परांशी वागण्याचे ठरलेले नियम असे ढोबळ मानाने सांगता येईल. माणसाने कसे जगावे, कोणत्या प्रकारची कृत्ये करावीत, त्याचे इतरांशी संबंध कसे असावेत त्याविषयीची सत्ये प्रस्थापित करण्याचा प्रयत्न म्हणजेच नीती. नी.नय्. म्हणजे नेणे, पुढे चालवणे या धातूवरून नीती हा शब्द बनला आहे. माणसाचे अमुक एक कृत्य चूक का बरोबर हे ठरविण्याचा जो एक विचार राहतो त्यालाच नीती म्हणतात.

इंग्रजीमध्ये नीतीला Morality असा शब्द आहे. लॅटिन भाषेतील mores या अनेकवचनी शब्दापासून तो आलेला आहे. mores म्हणजे कोणत्याही समाजात प्रस्थापित झालेल्या व त्या समाजास मान्य असलेल्या चालीरीती अथवा वागणुकीच्या रीती.[1] कित्येकदा ethics असा शब्दही वापरला जातो

कोणती कृत्ये करावी, कोणती करू नये, कोणती कृती योग्य, कोणती अयोग्य, कोणती युक्त कोणती अयुक्त असा प्रश्न माणसाला पडतो. कृती युक्त आहे का? असेल तर ती युक्त आहे हे ओळखण्याचा निकष कोणता? कृतीला युक्तता कशामुळे लाभते इ.प्रश्नांची उत्तरे नीती शोधते. नीती म्हणजे आचरणाविषयीचा विचार.

पदार्थाचा चांगले-वाईटपणा हा त्या पदार्थाचे मूल्य होय. अर्थातच त्यातील चांगलेपणाचा स्वीकार केला जातो.

**मूल्य :**

याची व्याख्या सर्वसाधारणतः अशी देता येईल की, ज्याची आशा धरावी ज्याची आकांक्षा धरावी ते मूल्य प्रकृतीला, समाजाला स्वास्थकारक ते मूल्य असे आदर्शवाद सांगतो.

**व्यक्ती व नीती :**

नैतिकतेचा त्याग करून माणूस राहू शकतो काय? नीतिनिरपेक्ष (amoral) राहणे माणसाला शक्य आहे काय? नीती ही मनुष्यास अनिवार्य आहे काय?

वरील प्रश्नांचा विचार करता आपल्याला असे दिसून येते की, नैतिकता सोडून माणसाला रहाता येणार नाही. रूढ नीतीविरूद्ध बंड म्हणजे नीतीविरूद्ध बंड नव्हे बंड करणारी ती व्यक्ती नीतीच्या परिघाच्या आतच असते. नीती जीवनावर परिणाम करते. नीती जीवनात सर्वगामी आहे, सर्वत्र अनुस्यूत आहे. जीवनात नीतीला विराम देता येत नाही.

व्यक्तीचे कल्याण ही नीतीशास्त्रातील मूलभूत संकल्पना आहे. व्यक्तीचे कल्याण हे तिच्या प्रकृतीच्या साफल्यात, परिपूर्तीत असते. प्रकृतीचे साफल्य होणे म्हणजे विशिष्ट इच्छा, वासना, प्रेरणांचे फुटकळपणे समाधान होणे नव्हे तर त्या संबंध प्रकृतीची सुसंवादीपणे परिपूर्ती होणे होय. प्रकृती म्हणजे इच्छा, वासना व इतर अनेक घटकांची एका विशिष्ट पद्धतीने झालेली घडण होय. माणसाने आपले कल्याण साधणे म्हणजे ज्या मार्गाने जगले असता त्याच्या प्रकृतीचे असे सुसंवादी समाधान होते तसे त्याने जगणे.

व्यक्तीला नैतिक संस्कारक्षमता विकसित करता येते. व्यक्तीचा नैतिक विकास वडिलधारे लोक व आजूबाजूचा समाज यावर अवलंबून असतो. व्यक्तीच्या बौद्धिक, कलात्मक या सर्व प्रकारच्या आयुष्यात नैतिक आचारांना स्थान असेल तरच व्यक्ती सुखी बनते, त्याचे जीवन समृद्ध बनते. त्यासाठी नैतिक आचरणाची आवश्यकता आहे. त्यातून मिळणारे आत्मसमाधान हे अवर्णनीय आहे म्हणूनच एपिक्यूरस म्हणतो,"मला नैतिकतेने वागावयाचे आहे ते देवांना संतुष्ट करण्यासाठी नव्हे तर स्वतःच्या समाधानासाठी होय."

**व्यक्तीगत हित व समाजहित यांचा परस्परसंबंध :**

माणूस हा समाजाचा एक घटक म्हणून अनिवार्यपणे जगतो आणि म्हणून व्यक्तीहित व समाजहित यामध्ये असणारा संबंध विचारात घेणे आवश्यक ठरते.

ॲरिस्टॉटलच्या मते व्यक्तीच्या आत्म्याचे वेगवेगळे घटक असले तरी त्याच्या ठिकाणी जशी एकता असते तशीच भिन्न व्यक्तींच्या मिळून बनलेल्या समाजाच्या ठिकाणी ही एकता असते. प्रत्येक व्यक्तीचे समाजात विशिष्ट स्थान असते व ह्या स्थानाला अनुरूप ठरेल अशारीतीने ती जगली असता तिचे कल्याण साधते.

जी. डब्ल्यू. एफ्. हेगेलच्या मते व्यक्ती ही समाजाचा, एका सामाजिकपूर्णचा घटक असते. कुटुंब, राज्यसंस्था, व्यवसाय इ. सामाजिक संस्था, प्रचलित रूढी, संकेत ह्या सर्वाद्वारा हे सामाजिक जीवन मूर्त झालेले असते. व त्यातून सामाजिक कल्याण साधले जात असते, ह्या प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या कल्याणकारी जीवनाशी व्यक्ती जेव्हा तादात्म्य पावते व स्वकर्तव्ये निष्ठेने पार पाडते तेव्हा ती स्वतःचे कल्याण साधते व समाजाचेही कल्याण साधते.

**सामाजिकदृष्ट्या नीतिमूल्यांचे महत्व :**

समाजाला समाज म्हणून टिकून राहण्यासाठी समाज घटकात नीतिमूल्ये रूजणे आवश्यक आहे वैयक्तिक, सामाजिक व राजकीय अशा तीनही प्रकारच्या जीवनात नैतिकता असेल तर तो समाज आदर्श होय. समाजाची उन्नती वा अवनती नीतितत्वांशी संबंधित आहे. नीतिहीन समाज हा निश्चित अधोगतीला जातो. या सर्वांवरून, नीतितत्वे अत्यंत मूलगामी असून मानवाच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात आवश्यक ठरतात हे निदर्शनास येते [2]. या नीतीचे स्वरूप पाहण्यापूर्वी नीतिशास्त्राचे काही लेखकांनी विविध प्रकार पाडले आहेत. त्याचा विचार करु.

या नीतिशास्त्रांच्या प्रकारापूर्वी नीतिशास्त्राची व्याख्याही पाहू.

नीतिशास्त्र हे शास्त्राचे शास्त्र आहे आणि त्रैलोक्यात ते उत्तम मार्गदर्शक आहे अशी शुक्राचार्यांची धारणा आहे. त्यांनी आपल्या ' शुक्रनीती ' या ग्रंथात नीतिशास्त्राची व्याख्या दिली आहे.

सर्वोपजीवकं लोकस्थितिकृन्नीतिशास्त्रकम् ।
धर्मार्थकाममूलां हि स्मृतं मोक्षप्रदं मत : ।। अ. १.5

नीतिशास्त्र हे सर्वांचे उपजीवक, लोकस्थितीला आवश्यक, त्रिविध पुरुषार्थाचे मूल आणि अंती मोक्ष साधून देणारे आहे असा या व्याख्येचा अर्थ आहे.

नीतिविषयी अनेक रीतींनी विचार करता येतो. त्यामुळे नीतिशास्त्राचे अनेक प्रकार करता येतात. त्यापैकी श्रीनिवास दीक्षितांनी आपल्या 'नीति-मीमांसा' या पुस्तकात दिलेले काही प्रकार पुढीलप्रमाणे -

१) **वर्णनात्मक नीतिविज्ञान** (Descriptive ethics)

समाजात नीतिविषयक संकल्पना असतात. काही संकेत रुढ झालेले असतात. उदा.सद्गुण कोणते, दुर्गुण कोणते इ.निरनिराळया समाजात व निरनिराळया काळी जे संकेत व आचार रुढ असतात त्यांचा तौलनिक अभ्यास करुन त्यात काही समान तत्व सापडते काय याचा अभ्यास करता येईल व त्यातून एक शास्त्र बनू शकेल. कोणत्या सामाजिक परिस्थितीत कोणते नैतिक संकेत रुढ होतात, त्यांच्यात कोणत्या रीतीने बदल घडतो इ.प्रश्नांची साधक बाधक चर्चा या संदर्भात होऊ शकेल.

यात कोणत्याही समाजात जे नैतिक संकेत अथवा नैतिक मानदंड प्रस्थापित झालेले असतात त्यांची केवळ तथ्ये या दृष्टीने नोंद घेऊन विज्ञानाच्या पध्दतीने काही निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केलेला असतो म्हणून अशा विवेचनाला वर्णनात्मक नीतिविज्ञान म्हणतात.

2) **आदर्शात्मक नीतिशास्त्र** -

यात शुभजीवनाची काही उपपत्ती मांडलेली असते. आचरणाचे काही मानदंड प्रस्थापित केलेले असतात. उदा.मिलची उपपत्ती - विशिष्ट परिस्थितीत ज्या कृतीने जास्तीत जास्त मानवी सुखाची निर्मिती होईल ती कृती मुक्त होय. **काण्ट** - कृतींची नैतिक योग्यता तिच्या परिणामावरुन ठरत नसून कृतीत अंतर्भूत केलेल्या नियमांवरुन ठरते. **स्पेन्सर** - मनुष्य हा निसर्गाची निर्मिती . निसर्गात एकसारखा विकास घडत आहे म्हणून निसर्गाच्या विकासाच्या नियमांना धरुन माणसाने आपल्या जीवनाची आखणी करावी हाच नीतिनियम. **ग्रीम** - आपल्या वास्तव स्वरुपाचा लाभ करुन घेणे हेच नैतिक जीवन होय.

थोडक्यात कृतींची युक्तता कशी ठरवायची, माणसाने कसे वागावे, काय प्राप्त करुन घ्यावे, इ.प्रश्नांची सुसंगत चर्चा असते. युक्ततेचा मानदंड अथवा निकष निर्माण करणे हे आदर्शात्मक नीतिशास्त्राचे

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

काम असते.

3) **अधिनीतिशास्त्र** (Meta ethics)

यात आचरणाचे नियम सापडतात. नैतिकतेचा निकष मिळतो. तो निकष वापरुन एखादी विशिष्ट कृती युक्त की अयुक्त हे ठरविता येईल. त्याचप्रमाणे नीतिनियमांचे प्रामाण्य सिध्द करणे आवश्यक असते.

निसर्गनियमांचे प्रामाण्य ठरवायचा प्रश्न येतो तेव्हा प्रत्यक्षात काय घडते याचा पुरावा म्हणून उपयोग करता येतो म्हणून तो नियम प्रमाण ठरतो. परंतु खरे बोलणे युक्त आहे या सारख्या नीतिनियमांचे प्रात्यक्षिक कसे देता येईल ? ते देता आले नाही तर त्या नियमास प्रामाण्य कोठून आणावयाचे ? तर नीतिनियमांचे प्रामाण्य शाबित करण्याचे काम ही नीतिशास्त्रचे करते. नीतिशास्त्राच्या या भागाला Meta ethics किंवा अधिनीतिशास्त्र किंवा नैतिक तत्वज्ञान म्हणतात.

4) **सामाजिक तत्वज्ञान** -

नैतिक तत्वज्ञान केवळ बुध्दिविलास असू शकत नाही. नीतीचा कृतीशी साक्षात संबंध आहे म्हणून तत्वचितक आपली नैतिक उपपत्ती समाज जीवनाला लागू करु पाहतात. समाजरचना कशी असावी, समाजात सर्वांना समान स्थान देता येईल काय ? समानता याचा अर्थ काय ? व्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ काय ? त्याचे महत्व काय, संपत्तीची विभागणी कशी करावी, शासनाचे स्वरुप काय असावे, शिक्षणाचे उद्‌दिष्ट कोणते हे सर्व प्रश्न अंतीमतः नैतिकच आहेत. कारण माणसाने जगावे कसे आणि कशासाठी यावर त्यांची उत्तरे अवलंबुन आहेत. ज्या प्रकारच्या आदर्शात्मक नीतिशास्त्राचा आपण स्वीकार करु त्या प्रकारावरुन त्या प्रश्नांची उत्तरे ठरत जातील. म्हणून सामाजिक तत्वज्ञान हा विषय सुध्दा नैतिक तत्वविचाराचा एक भाग म्हटला पाहिजे. सारांशाने नीतिमीमांसेतील अमूर्त तत्वांना सामाजिक आशय देण्याविषयीचा विचार म्हणजे सामाजिक तत्वज्ञान होय.

5) **किंकर्तव्यता शास्त्र** ( Casuistry )

अमक्या प्रसंगी मी काय करावे ? अशा विशिष्ट प्रश्नांची उत्तरे देणारे शास्त्र तयार झाल्यास त्याला किंकर्तव्यता शास्त्र म्हणता येते ते आचरणाच्या तपशीलासंबंधी मार्गदर्शन करते.

असे हे दीक्षितांनी सांगितलेले नीतिशास्त्राचे प्रकार. त्यानंतर आता नीतिच्या स्वरुपाचे विवेचन करु.

**नीतीचे स्वरुप -**

नीती ही कृतीशी संबध्दित असते. नैतिक विचार हा जीवनव्यवहाराशी निगडित असतो. तो प्रॅक्टिकल असतो. कृतीला प्रेरणा देण्याचे कार्य नैतिक विधाने करतात. म्हणून पाश्चात्य परंपरेत नीतिशास्त्र हे Practical Science आहे असे म्हटले जाते.

**नैतिकता व स्वातंत्र्य -**

नैतिकतेमध्ये मनुष्य स्वतंत्र आहे असे गृहीत धरलेले असते. नीती कर्तव्य सांगते त्यामुळे जे अशक्य आहे ते माझे कर्तव्य नव्हे व असणारही नाही. परंतु कर्तव्य म्हणून काही असेल तर ते करणे मला शक्य असलेच पाहिजे. कर्तव्यतेने शक्यता अनुलक्षित होते. (Ought implies can) असे काण्ट म्हणतात. माणसाचे स्वातंत्र्य म्हणजे त्याचे संकल्प करण्याचे स्वातंत्र्य, आणि विवेकाने तो संकल्प निवडण्याचे सामर्थ्य होय.[3]

**नीतिनियमांची सापेक्षता -**

सत्य, दया, क्षमा, अहिंसा, परोपकार इ. नीतीची मूलतत्वे आहेत. ती जगन्मान्य आहेत. सर्व धर्मांना मान्य आहेत. हे जरी खरे असले तरीही नीतिनियम हे निरपवाद, निरपेक्ष असे असू शकत नाहीत ही बाजू आपण ध्यानात घेणे आवश्यक आहे. अर्थात् निरपेक्ष या अर्थाने की, ती मूल्ये सर्वत्र वापरली जाण्यासारखी असतात काय ? अर्थातच नीतिमूल्ये ही सार्वत्रिक व सार्वकालिक नसतात.

नीतिमूल्ये ही काळ, स्थळ, व्यक्ती, समाज प्रसंग इ.शी सापेक्ष असतात. त्याचप्रमाणे ती कुल, जाती, वर्ग, पंथ, धर्म, राष्ट्र या दृष्टीनेही सापेक्ष आहेत असे आपणास दिसते. सापेक्ष याचा अर्थ नैतिक मूल्ये ही परिस्थितीनुसार बदलतात. चाली,रुढी या तत्कालानुरुप असतात.[4] समाजाची स्थिती बदलताच हया चाली रुढी बदलतात. आता ही सापेक्षता आपण उदाहरणाने दाखवून देण्याचा प्रयत्न करु.

**कालसापेक्ष** - एके काळी नियोगाची चाल नीती म्हणून मानली होती. परंतु पुढे हा नियम नष्ट करण्यात आला. पूर्वी पातिव्रत्य हा सद्गुण मानला जात असे. परंतु गेल्या शंभर वर्षात पातिव्रत्याच्या स्वरुपाविषयी

आपल्या समाजातील कल्पना कितीतरी बदलल्या. तसेच सतीच्या चालीविषयीही. सती जाणे हे एके काळी नीतिमत्तेचे आचरण मानले जाई परंतु आज सतीची चाल कालबाह्य

नीतिनिकष निरपेक्ष नसून सापेक्ष आहेत ही गोष्ट सामाजिक जीवनाचा अभ्यास केल्याने तसेच ऐतिहासिक अभ्यासानेही स्पष्ट होते. समाजजीवन जसजसे विकसित व उन्नत होत गेले तसतशी नीतिमूल्ये बदलली. व्यक्तीला म्हणा वा समाजाला म्हणा अविकसित अवस्थेत ज्या गोष्टी नीतीच्या वाटतात त्याच गोष्टी त्याच व्यक्तीला वा समाजाला विकसित अवस्था प्राप्त झाल्यानंतर नीतीच्या वाटत नाहीत अनीतीच्या वाटतात.

ऐतिहासिक दृष्टया पाहता, मूल्यांकडे येण्याचा मानवजातीचा जो मार्ग तो सर्वसाधारणपणे अनुभव होय, चुकीची दुरुस्ती होय. चुका करीत, अमूक केले तर घोटाळे होतात असा अनुभव घेत काही मूल्यांची आवश्यकता माणसाना पटत गेली असली पाहिजे. उदा. जमातीची नीती घेतली तर ती अतिशय कडक असते. जमातीतील व्यक्तींविषयी एक नीती होती व बाहेरच्या व्यक्तींविषयी वेगळी होती. हळूहळू अनुभवाने ती नीती टिकू शकत नाही. तिच्यामुळे अनिष्ट गोष्टी घडून येतात हे लोकांना दिसू लागले आणि जमातवादी नीतीत परिवर्तन होऊ लागले.

**स्थळसापेक्ष** - स्थळ वा ठिकाण बदलले की नीतीनियमही बदलतात. उदा. आपल्या इकडे मामाच्या मुलीबरोबर लग्न होऊ शकते. ते नीतिबाहय मानले जात नाही. परंतु उत्तर भारतात मात्र असा विवाह नीतिबाहय मानलेला आहे.

**व्यक्तीसापेक्ष** - नैतिक मूल्ये ही व्यक्ती प्रमाणे बदलतात. उदाहरणार्थ सर्व भूतांशी निर्वैर व्हावे हे नीतिमूल्य होय. परंतु मायावी पुरुषाशी मायावीपणे व साधूंशी साधुत्वानेच वागावे असा उपदेश भीष्मही अनेकदा करतात. समोरची व्यक्ती बघूनच कित्येकदा नीतिनियम बदलतात. उदा.मारेक-याने एखादया माणसाचा पत्ता विचारला तर अशावेळी तो मारेकरी आहे हे माहीत असता पत्ता सांगणार का ? तर अशावेळी सत्यापेक्षा अहिंसाश्रेष्ठ असते म्हणून माणसाचा पत्ता माहीत असूनही सांगणार नाही.

**समाजसापेक्ष** - निरनिराळया समाजातील नैतीक मूल्ये सारखीच असतात असे नाही. उदा. पहिली पत्नी हयात असताना आणि घरी नांदती असताना दुसरे लग्न करणे हे खिस्ती समाजात अनैतिक मानले जाईल पण

मुस्लीम समाजात त्याला नैतिक दृष्टया आक्षेपार्ह मानले जाणार नाही.

**प्रसंगसापेक्ष** - प्रसंगानुरुप नैतिक नियम बदलतात अगर बदलावे लागतात. उदा. कॅन्सरच्या रोग्यावर उपचार करणा-या डॉक्टरवर आलेला प्रसंग. रोग्याला आपल्याला कॅन्सर झाला आहे हे माहित नाही आणि आपण बरे केव्हा होणार हे तो डॉक्टरला विचारतो. डॉक्टरला माहित असते की हा रोगी थोडयाच दिवसात मरणार आहे. आता येथे डॉक्टर सत्य सांगण्यापेक्षा खोटे सांगून रोग्याला मानसिक यातनांपासून वाचवील. जीवनामध्ये असे नैतिक संघर्ष ठायी ठायी निर्माण होतात. अशावेळी त्या व्यक्तीने प्रसंगाला अनुरुप अशा नैतिक मूल्याच्याच प्रेरणेने कृती केली पाहिजे.

**राष्ट्रसापेक्ष** - देशाच्या कक्षेतील नीतिशास्त्र निराळे व त्या कक्षेबाहेरील नीतिशास्त्र निराळे. गृहनीती निराळी व परमीती निराळी. चालून येणारा शत्रू हा पर म्हणजे परका असतो. तो आपल्या सर्वनाशास उद्युक्त झालेला असतो. अशावेळी राष्ट्रसंरक्षण ही सर्वश्रेष्ठ नीती होय. त्यावेळी सत्य, अहिंसा, औदार्य या नीतिमूल्यांचा बळी देऊनही ज्या उपायांनी शत्रूचा नाश करणे शक्य असेल त्या त्या सर्व उपायांचाा अवलंब करणे हेच त्याचे नैतिक काम होय. परंतु जेव्हा राष्ट्राच्या अभ्यंतरात कुल, जाती, वर्ण, धर्म, राज्ये या विभागांनी अराजकता असेल, राष्ट्राला धोका असेल तेव्हा ही उपरोक्त परनीती वापरणे अयोग्य वा अस्थानी ठरेल. कारण सर्व राष्ट्र हीच मायभूमी असेल तर अभ्यंतरात कीतीही भिन्न विभाग असले तरी ते पर नाहीत म्हणून अशा ठिकाणी गृहनीतीच वापरली पाहिजे.

**निरपेक्षता** - वेगळया दृष्टीने पाहता नीतिमूल्ये निरपेक्ष आहेत असेही येते. व्यक्ती जरी वेगवेगळया प्रसंगी वेगवेगळया रीतीने वागत असली तरी त्यामुळे ती मूल्ये मात्र बदलत नाहीत. परंतु त्या मूल्यांचा आविष्कार भिन्न भिन्न असतो. आचारविचारातील वेगळेपणा हा परिस्थितीसापेक्ष, कालसापेक्ष, व्यक्तिसापेक्ष असतो पण त्यातील तत्व निरपेक्ष असते असे सांगता येईल. उदा. अतिथीदेवो भव हे अतिथीचे आदरातिथ्य करणे हे मूल्य ते सर्वांनाच अभिप्रेत असते. परंतु त्याचे अविष्कार भिन्न भिन्न असतात. काहीही खर्ची न घालता केवळ दिखाऊपणे प्रसंग मारुन नेण्यापासून तो श्रियाळ चांगुणेप्रमाणे आपल्या एकुलत्या एक लहानग्याचा बळी देऊन अतिथीला संतुष्ट करण्यापर्यंत विविध प्रसंगात विविध पर्याय दिसतात. परंतु आदरातिथ्य सर्वांनाच अभिप्रेत असते.

**पुरूषार्थ व नीती -** धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरूषार्थ भारतीय नैतिक विचारात आहे. यापैकी मोक्ष हा परमपुरूषार्थ पारलौकिक आहे. म्हणून त्याची चर्चा आवश्यक नाही. परंतु धर्म, अर्थ, काम हे तीनही पुरूषार्थ इहलौकिक व नीतीही इहलौकिक आहे. म्हणून त्या तीन पुरूषार्थांची चर्चा येथे करू.

धर्म, अर्थ व काम यापैकी धर्म हा पहिला पुरूषार्थ. तो अर्थ या पुरूषार्थाचा पाया आहे. धर्म याच्या अनेक अर्थापैकी या ठिकाणी त्याचा अर्थ सामाजिक नीती होय. ज्या समाजात ही नीती पाळली जात नाही तेथील अर्थव्यवस्था कोलमडते. असा अनुभव इतिहासात येतो. कारण अर्थव्यवस्था नीट चालण्यास प्रमाणिकपणा, व्यक्ती-व्यक्तींमधील परस्पर विश्वास इ. गुण आवश्यक आहेत त्यांचा लोप झाल्यास आर्थिक अवनती होते. श्रमिकांनी प्रामाणिकपणे काम केले नाही अथवा कारखान्याच्या चालकांनी विश्वासघात केला तर कोणताही धंदा मोडीत निघेल.

अर्थ ह्याचा अर्थ केवळ द्रव्यप्राप्ती नव्हे तर व्यक्तिजीवनाला व समाजजीवनाला व्यापून राहणारा सारा आर्थिक व्यवसाय होय. सर्व समाजातील शक्तींचे नीट धारण होईल, पोषण होईल अशा स्वरूपाचे अर्थव्यवसाय हवेत.

आर्थिक समृद्धीतून काम या तिस-या पुरूषार्थाची प्राप्ती होते. सर्व त-हेचे सुखोपभोग या पुरूषार्थात अंतर्भूत आहेत.

**नीतिनिकष -** नीतिशास्त्र जेव्हा एखादी गोष्ट अशी करावी असे सांगते, ते सांगताना नीतिशास्त्र काही प्रमाणांचा अवलंब करते. अशावेळी आपल्याला नियमांच्या स्वरूपाकडे पहावे लागते. तेथे आपल्या निदर्शनास असे येते की, काही नियम आपल्यावर बाह्य सत्तेकडून लादले जातात तर काही माणसाच्या आंतरिक जीवनातून स्फुरतात.

यापैकी बाह्य नियम हेच नीतिनिर्णयाचे निकष होत असे म्हणणारी एक बाजू आहे. समाजधारणेसाठी समाजघटकांवर समाज काही नियम लादतो. उदा. समाजकायदा, जमातीचा कायदा इ. यांना बाह्य नियम म्हणतात. बाह्यनियमानुसार कृती ती नैतिक कृती व बाह्यनियमाविरूद्ध कृती ती अनैतिक कृती असे प्रतिपादन केले जाते. यालाच बाह्यनियमवाद असे म्हणतात.[5]

अर्थात् या नियमांनुसार नीतिमत्तेसाठी आवश्यक ती भूमिका तयार केली जाते. जीवनाच्या प्राथमिक अवस्थेत हे नियम अत्यंत महत्वपूर्ण कामगिरी बजावतात.

जेव्हा चांगले काय व वाईट काय असा प्रश्न निर्माण होतो तेव्हा तो वस्तुनिष्ठ प्रमाणाने सोडविता येत नाही. चांगले ते करावे व वाईट करू नये हे तर्काने प्राप्त होत असे म्हणता येत नाही. म्हणून व्यासांनी 'महाभारतात धर्मराजाच्या तोंडी सांगितले की, अशा प्रश्नांच्या बाबतीत 'तर्कोऽप्रतिष्ठः।'

मग चांगले, वाईट ठरवायचे कसे तर मानवाच्या आंतरिक स्फूर्तीने या आंतरिक स्फूर्तीला आंतरनियम असे म्हणतात. यालाच कोणी मनाचा कौल, सद्सद्विवेकबुद्धी असेही म्हणतात. नीतिक्षेत्रात सुजीवनाची मीमांसा करण्याचे काम विवेकालाच करावे लागते. नीती म्हणजे कर्माकर्मविवेक अशीही नीतीची एक व्याख्या केली जाते. कोणत्याही पेचप्रसंगी सद्सद्विवेकबुद्धीला कौल लावावा व तेव्हा जो निर्णय होईल तोच योग्य निर्णय होय. कारण अशावेळी हा विवेक, ही बुद्धी नियमनिर्माती, आक्षेपक, साक्षी व न्यायदेवता या चारही रूपांनी एकदमच म्हणजे एकाच वेळी अवतीर्ण होते असे मूरहेड म्हणतो. (Conscience is at once a law giver, accusar, witness & judge) [6]

विवेकी आणि सात्विक प्रवृत्ती असलेल्या सज्जनाच्या मनाचा कौल हेच प्रमाण दाखवावे लागते. ही अंतःप्रेरणा सत्प्रवृत्त पुरूषाच्या अंतःकरणाची असते असे कालिदास म्हणतो. आत्म्याचा संतोष हेच प्रमाण मनूनेही मानले आहे. नैतिक आचरण हे आत्मसमाधानाचे मूळ आहे. विवेकशीलता ही व्यक्तीच्या नैतिक उन्नतीला साहाय्यभूत होते.

'साधे जीवन व उदात्त विचार' हे वचन जीवनाचा गुणधर्म ठरविताना आदर्शभूत मानले आहे. स्वतःच्या इच्छातृप्तीपासून लाभणा-या समाधानापलीकडे काही मूल्ये आहेत. बौद्धधर्मात त्याला 'पारमिता' हा शब्द वापरला आहे. 'पारमिता' म्हणजे टोकाला जाणे, उत्कृष्टपणाचा कळस गाठणे, परिपूर्णता गाठणे. प्रज्ञा, करूणा, दान इ. सद्गुण काही प्रमाणात साध्य करून समाधानी असता कामा नये तर या गुणांचा कळस गाठेपर्यंत त्यांची साधना चालू राहिली पाहिजे.

ही पारमितेची संकल्पना भारतीय नैतिक विचारात व नैतिक साधनेत इतकी खोलवर रूजली

आहे की, तिचे प्रतिबिंब आपल्या साहित्यातही पडलेले आहे. उदा. मृच्छकटिकातील चारूदत्त घ्या. तो 'दानपरिमितेचे उदाहरण आहे. शर्विलकाने इतका खटाटोप केला, भितीला इतके सुरेख वर्तुलाकार भोक पाडले पण आपल्यासारख्या दरिद्री माणसाच्या घरात त्याला काहीच मिळाले नसणार म्हणून तो हळहळतो.[7]

थोडक्यात आत्मसमाधानापलीकडेही काही प्रमाण मानावे लागते ते म्हणजे व्यक्ती ज्या समाजात राहते ज्या लोकांमध्ये राहते त्या समाजाचे हित, त्या लोकांचे हित हेही कर्माकर्मविवेकाचे प्रमाण होय. समाजाचे धारण-पोषण हाच खरा धर्म असल्याने महाभारतातही अनेकदा समाजहित हीच कार्यकारणाची कसोटी मानलेली आहे. भिन्नकक्षांमध्ये भिन्न भिन्न नीतीचाच अवलंब अशावेळी करणे आवश्यक असते तसे न केल्यास अनवस्था ओढवेल म्हणून माणसाने आपण रहात असलेल्या समाजाशी एकनिष्ठ राहून त्याच्या उन्नतीची, त्याच्या विकासाची योग्य नीती अनुसरावी कारण माणुस हा समाजाविना एकटा राहूच शकत नाही म्हणून 'विवेके क्रिया आपुली पालटून' समाजाशी एकनिष्ठ रहावे.

पुराणकथांतील अनेक घटनांना नैतिक आदर्श व मार्गदर्शक तत्व या दृष्टींनीही मूल्य असते. लॉर्ड बेकनने ग्रीक पुराणकथांना नैतिक रूपककथा म्हटले आहे. क्रमाने भारतीय पुराणकथांत नीतिमूल्ये कशी आढळतात ते आता बघू. त्यांच्यामध्ये असलेली नैतिकता अनैतिकता कोणती? कोणत्या कथा ह्या नीतिबाह्य वाटतात यांचे विवेचन पुढील प्रकरणांमध्ये करू.

* * *

1. नीतिमीमांसा · श्रीनिवास दीक्षित प्रकाशक मतम मंडळ पुणे 1982

2. मराठी विश्वकोश भाग 8-13

3. मूलगामी मानवतावाद - व्ही. एम्. तारकुडे, अनुवादक द्वा.भ.कर्णिक, श्रीविद्या प्रकाशन

4. भारतीय संस्कृतिकोश भाग 5.

5. Elements of edhics Muirhead P.82

6. नीतिमीमांसा - पां. दा. चौधरी विद्या प्रकाशन, नागपूर.

7. अध्यात्म आणि विज्ञान - संपादक विलास खोले.